


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक २४८ वा. ✻ सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 248 ✻ Monday 13 April 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

## देशात भारतीय जनता पार्टीची यशस्वी वाटचाल सुरू : आ.डॉ.अतुलबाबा भोसले



कराड : संघटनशक्ती, कार्यकर्त्यांची निष्ठा आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी घेतलेले ठाम निर्णय यांच्या बळावर देशात भारतीय जनता पार्टीची यशस्वी वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी केले. पक्षाच्या ४६ व्या वर्धापनदिनानिमित्त कराड दक्षिण मंडलच्यावतीने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

भाजपा कराड दक्षिण मंडलमधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी विजयनगर (ता. कराड) येथील पार्वती लॉन्स येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रहित, सुशासन आणि सर्वांगीण विकास या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवत भाजपाने देशातील जनतेचा दृढ विश्वास संपादन केला आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाच्या योजना पोहोचवण्याचा ध्यास बाळगून कार्यकर्त्यांनी कार्यरत राहावे.

या निवासी प्रशिक्षण शिबिरात पक्ष सदस्य नोंदणी, पक्षाचा इतिहास व विकासकार्य, सोशल मीडिया व ए.आय., नमो ॲप व सरल ॲप, केंद्र व राज्य शासनाच्या योजना व कामगिरी, बूथ व्यवस्थापन, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवनकार्य आणि जनसंघ ते भारतीय जनता पक्षापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास याविषयी विविध वक्त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी माजी आमदार आनंदराव पाटील, विक्रम पावसकर, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. प्रियाताई शिंदे, जिल्हा परिषद सदस्या सौ. शैलजा शिंदे, प्रियांका साळुंखे, कराड पंचायत समितीच्या सभापती सौ. नंदाताई यादव, पंचायत समिती सदस्य अर्जुन कराळे, पै. धनंजय पाटील, सौ. वर्षा निकम, सौ. माधवी पाटसुपे, कराड नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर, नगरसेवक सुहास जगताप, शिवाजीराव पवार, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, बांधकाम सभापती हणमंतराव जाधव, माजी जि.प. सदस्य शंकराव खबाले, पक्षाचे राज्य परिषद सदस्य हर्षवर्धन मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष पिनू जाधव, युवा मोर्चा अध्यक्ष चिन्मय कुलकर्णी, रेणूताई येळगावकर, तेजस जमदाडे, सुहास जगताप, माजी नगरसेवक शिवाजीराव पवार, वैष्णवी वायदंडे, किशोरी शिंदे, माजी नगराध्यक्षा रोहिणी शिंदे, माजी नगरसेविका स्मिता हुलवान, प्रदेश सचिव कविता कचरे, डॉ. राजेंद्र पाटील, कराड मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष माणिकराव पाटील, मंडल अध्यक्ष राजेंद्र यादव, प्रवीण साळुंखे, शंकर निकम व सुषमा लोखंडे उपस्थित होते. या शिबिरास भाजपाचे बूथ अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले सूरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या पार्थिवाचे दर्शन



मुंबई : ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित सूरसम्राज्ञी आशा भोसले यांचे आज मुंबईतील बीच कँडी रुग्णालय येथे निधन झाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच्या राहत्या घरी जाऊन त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, आमदार सुनील शिंदे, आमदार प्रसाद लाड यांनीही श्रद्धांजली अर्पण केली. सूरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या पार्थिवावर उद्या, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती मंत्री ॲड.शेलार यांनी दिली.

## महाराष्ट्र प्रदेश महात्मा ज्योतिबा फुले उत्सव समितीची नियोजन बैठक संपन्न




पुणे : काँग्रेस पक्ष संघटन मजबुतीच्या दृष्टीने अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेशात महात्मा ज्योतिबा फुले उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, या समितीची पहिली नियोजन बैठक पुण्यात उत्साहात पार पडली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत समितीच्या प्रदेशाध्यक्षपदी भानुदास माळी यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या समितीच्या माध्यमातून शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार राज्यभर करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या बैठकीत वर्षभर राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी उत्सव समितीच्या सर्व उपक्रमांना स्वतः उपस्थित राहून पूर्ण पाठिंबा देण्याची ग्वाही दिली.

समितीचे अध्यक्ष भानुदास माळी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सामाजिक विचारांचा प्रसार करतानाच काँग्रेस पक्षाची ध्येय-धोरणे जनतेपर्यंत पोहोचवून संघटन बळकट करण्याचे कार्य समितीच्या माध्यमातून राबविण्यात येईल. तसेच, ११ एप्रिल २०२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कडगून येथे वर्षभर चाललेल्या उपक्रमांचा समारोप मोठ्या सभेद्वारे करण्यात येणार असून, या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अशोक गेहलोत आदी वरिष्ठ नेते उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस माजी मंत्री रमेश बागवे, माजी आमदार दीप्तीताई चौधरी, पुणे शहर जिल्हाध्यक्ष अरविंद शिंदे, नगरसेवक साहिल केदारी, प्रशांत जगताप, तसेच विविध पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, महात्मा फुले जयंतीनिमित्त १० हजार किलो मिसळ-पाव वाटप उपक्रम राबविल्याबद्दल बाळासाहेब अमराळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, बारामती येथील विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी यावेळी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

कार्यक्रमाचे आयोजन काँग्रेस भवन येथे करण्यात आले होते. यासाठी पुणे शहर जिल्हाध्यक्ष प्रदीप परदेशी, कुमार राठोड, जीवन चाकणकर, बाळासाहेब विभुते, प्रणव परदेशी व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आशा भोसले यांचे अखेरचे स्वप्न अपूर्ण

### चोरे गावातील नव्या घराला मुकल्या स्वरसम्राज्ञी





(गोरख तावरे)

कराड : स्वरस्वामिनी आशा भोसले यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकमग्न झाला असताना, कराड तालुक्यातील चोरे गावाशी निगडित एक हळवा पैलू समोर आला आहे. सासर असलेल्या या गावातील नव्याने उभारलेल्या घराला भेट देण्याचे त्यांचे अखेरचे स्वप्न अपूर्णच राहिले.मुंबईत त्यांनी अखेरचा श्वास घेतल्याची वार्ता पसरताच चोरे गावासह कराड परिसरातही शोककळा पसरली. आशा भोसले यांचे सासर कराड तालुक्यातील चोरे येथे असून, भोसले कुटुंबीयांशी त्यांचे अतूट आणि जिव्हाळ्याचे नाते शेवटपर्यंत कायम होते. गावाशी असलेली ही नाळ त्यांनी कधीही तुटू दिली नाही.

कुटुंबीयांनी सांगितल्यानुसार, चोरे गावात नव्याने उभारण्यात आलेल्या घराला भेट देण्याची त्यांची मनापासून इच्छा होती. मात्र, प्रकृतीच्या कारणामुळे हा योग जुळून आला नाही आणि हे स्वप्न अपूर्णच राहिले. सुमारे दोन वर्षांपूर्वी त्यांनी शेवटची चोरे गावाला भेट दिली होती. त्यानंतर प्रत्यक्ष येणे शक्य झाले नसले तरी कुटुंबीयांशी त्यांचा संपर्क आणि आपुलकी तशीच कायम होती.

आशा भोसले यांच्या जाण्याने भारतीय संगीतविश्वावरच नव्हे तर त्यांच्या सासरच्या चोरे गावावरही दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या आठवणींनी आजही हे गाव भारावले असून, 'आपलीच मुलगी' अशी भावना गावकऱ्यांच्या मनात आहे.

### सासर, श्रद्धा आणि आठवणींचा प्रवास

स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांचे आयुष्य केवळ सुरांच्या दुनियेत मर्यादित नव्हते, तर त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही कराड तालुक्यातील चोरे गावाशी जुळलेली एक भावनिक नाळ होती. तबलावादक विशारद गणपतराव भोसले यांच्यासोबतच्या त्यांच्या सहजीवनातून ही नाळ अधिक दृढ झाली. गणपतराव भोसले हे मूळचे कराड तालुक्यातील चोरे गावचे रहिवासी होते. संगीताच्या प्रवासात एकत्र आलेल्या या दोन कलावंतांनी पुढे आयुष्यभराची साथ देण्याचा निर्णय घेतला आणि विवाहबंधनात अडकले. या नात्यामुळे चोरे गावाशी आशा भोसले यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले.

दोन वर्षांपूर्वी त्या आपल्या मुलगा व नातवंडांसह चोरे गावी आल्या होत्या. गावातील कुटुंबीयांसोबत त्यांनी वेळ घालवत जुन्या आठवणींना उजाळा दिला होता. त्यांच्या या भेटीमुळे गावकऱ्यांमध्येही विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. श्रद्धा आणि परंपरेशी त्यांचे घट्ट नाते असल्याचेही अनेक प्रसंगातून दिसून येते. पाटण तालुक्यातील निकवणे येथील जानाई देवीच्या दर्शनासाठी त्यांनी विशेष येऊन नवस फेडला होता. एवढेच नव्हे, तर देवीवरील श्रद्धेपोटी त्यांनी आपल्या नातीचे नावही 'जानाई' असे ठेवले होते. चोरे गावात त्यांच्या नावावर शेती असून, तिची देखभाल त्यांचे पुतणे चंद्रकांत भोसले करत आहेत. या शेतीमुळेही त्यांचे गावाशी असलेले नाते अधिक घट्ट राहिले होते.

स्वरांच्या माध्यमातून जग जिंकणाऱ्या आशा भोसले यांच्या आयुष्यातील हा साधा, मातीशी जोडलेला पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वेगळीच ओळख करून देतो. चोरे गावासाठी त्या केवळ जागतिक कीर्तीच्या गायिका नव्हत्या, तर 'आपल्या घरातील' सदस्य होत्या - आणि म्हणूनच त्यांच्या आठवणी आजही गावाच्या प्रत्येक कणात जिवंत आहेत. स्वरांच्या माध्यमातून पिढ्यान्पिढ्या रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या दिग्गज गायिकेचं चोरे गावाशी असलेलं हे नातं कायम स्मरणात राहणार आहे.

## कराड उत्तरमध्ये नागरिकांच्या समस्या निवारणासाठी विशेष बैठक

### रामकृष्ण वेताळ उपस्थित राहणार

कराड : कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या विविध समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यावर निवारण करण्यासाठी विशेष जनसंपर्क व समस्या निवारण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ हे सोमवारी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत सुर्ली (ता. कराड) येथील आनंदराज फार्म हाऊस येथे उपस्थित राहणार आहेत. या वेळी नागरिकांच्या तक्रारी, अडचणी व मागण्यांची थेट नोंद घेऊन संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या बैठकीत विशेषतः शेती, पाणीपुरवठा, कृषी योजना, शिक्षण, सामाजिक प्रश्न तसेच ग्रामविकासाशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नागरिकांच्या अडचणींवर तात्काळ उपाययोजना करण्याच्या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली असून, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्याने हाताळले जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## मारूल हवेली येथे विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात

मारूल हवेली : मारूल हवेली (ता. पाटण) येथील श्री सिद्धेश्वर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाच्या वातावरणात पार पडले. मंदिराच्या विकास व सुशोभीकरणासाठी करण्यात आलेल्या कामांचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. माजी खासदार श्रीनिवास पाटील यांच्या मार्गदर्शनातून व देणगीतून सिद्धेश्वर पिंडीचा वज्रलेप करण्यात आला असून पिंडीस नवे पितळेचे कवच बसविण्यात आले. याशिवाय श्री पार्वती, श्री दत्त यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना, गाभाऱ्याचे सुशोभीकरण तसेच प्रवेशद्वाराचे नूतनीकरण करण्यात आले. कार्यक्रमानिमित्त होमहवन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीनिवास पाटील यांच्यासह सनबीम शिक्षण समूहाचे अध्यक्ष सारंग पाटील, मिरज संस्थानचे युवराज श्रीमंत माधवराजे पटवर्धन, युवराणी श्रीमंत आनुसयाराजे पटवर्धन तसेच सौ.रचनादेवी पाटील, अंशुमन पाटील उपस्थित होते.

दरम्यान, पुरातन मूर्तींचे वज्रलेपाद्वारे पुनर्जतन करणारे मुर्तीकार प्रसाद परब यांनी झीज झालेल्या पिंडीचे पुनरुज्जीवन करून तिला मूळ स्वरूप प्राप्त करून दिले आहे. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. मारूल गावासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले व धार्मिक विधींमध्ये सहभागी होत भक्तिभाव व्यक्त केला.

## आता २५ दिवसात गॅस सिलिंडर बुक करता येणार

**शहरी भागांसाठी नवी नियमावली जारी ग्रामीण भागांत ४५ दिवसांची मर्यादा कायम बुकिंगनंतरही करावी लागतेय बरीच परीक्षा?**

नवी दिल्ली : एलपीजी गॅस सिलिंडरबद्दल अजूनही सर्वसामान्यांमध्ये चिंता असल्याचे दिसत आहे. परंतु भारत सरकारने स्पष्ट केले आहे की देशात एलपीजीची कोणतीही कमतरता नाही. त्यामुळे साठेबाजी करू नका आणि घाबरून बुकिंग करण्याची घाई करू नका, असा आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

एलपीजी सिलिंडर बुकिंगसंदर्भातले नवे नियम पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आले आहेत. आता शहरी भागात २५ दिवसांच्या आत सिलिंडर बुक करता येणार आहे. पण गॅस सिलिंडर बुक केल्यानंतर तो तुम्हाला किती दिवसांत मिळेल, हे माहीत आहे का?



पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले की, एलपीजी सिलिंडर वितरणाला पूर्वीपेक्षा थोडा जास्त वेळ लागत आहे. पूर्वीच्या तुलनेत सिलिंडर वितरणात थोडा विलंब होत आहे. पूर्वी सिलिंडर दोन ते तीन दिवसांत मिळायचं, पण आता नागरिक घाबरून अधिक प्रमाणात बुकिंग करत आहेत. त्यामुळे डिलिव्हरीला चार ते पाच दिवस किंवा काही ठिकाणी त्याहीपेक्षा जास्त काळ लागू शकतो, असे त्या म्हणाल्या. ही परिस्थिती लवकरच पूर्ववत होईल अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. पश्चिम आशियातील सध्याच्या संकटामुळे देशभरात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला. एलपीजीच्या पुरवठ्याबाबत दबाव वाढत असून त्या पार्श्वभूमीवर आता सरकारने ग्राहकांना घाबरून खरेदी न करण्याचा आणि अनावश्यक एलपीजी बुकिंग न करण्याचा इशारा दिला आहे.

एलपीजी सिलिंडरसाठी अनेक नागरिक थेट वितरकांकडे जाऊन रांगा लावताना दिसत आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नागरिकांना डिजिटल बुकिंग माध्यमांचा वापर करण्याचं आवाहन केलं आहे. जेणेकरून वितरण सुव्यवस्थित होईल आणि पुरवठ्यातील व्यत्यय टाळता येईल. त्यातही अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरवापर रोखण्यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड अनिवार्य करण्यात आला आहे.

# संपादकीय....

## स्वरांचा झरा

भारतीय संगीतविश्वाला आपल्या मधुर स्वरांनी समृद्ध करणाऱ्या आशा भोसले यांच्या निधनाने एका बहुआयामी युगाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत आहे. गानसम्राज्ञी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आशा भोसले यांचा प्रवास केवळ यशाचा नव्हता, तर तो संघर्ष, जिद्द आणि सातत्यपूर्ण साधनेचा प्रेरणादायी आदर्श होता.मंगेशकर कुटुंबाने भारताला दिलेली स्वरांची देणगी ही अतुलनीय आहे. या घराण्याने हिंदीसह विविध भारतीय भाषांमध्ये अवीट गोडीची गाणी दिली. या तेजस्वी परंपरेतील दोन भव्य स्तंभ म्हणजे लता मंगेशकर आणि आशा भोसले. काही वर्षांपूर्वी लता मंगेशकर यांच्या निधनाने संगीतविश्व हादरले होते; आणि आज आशा भोसले यांच्या जाण्याने त्या पोकळीची जाणीव अधिक तीव्र झाली आहे. या दोन्ही बहिणींनी आपल्या स्वरांनी केवळ मनोरंजनच केले नाही, तर समाजप्रबोधनाचीही भूमिका पार पाडली. प्रेमगीत, भावगीत, भक्तीगीत, लोकगीते अशा विविध प्रकारांतून त्यांनी प्रत्येक पिढीच्या भावविश्वाला स्पर्श केला. त्यांच्या आवाजात केवळ सुरांची माधुरी नव्हती, तर जीवनाचे विविध रंग होते. आनंद, वेदना, आशा, प्रेम आणि अध्यात्म.आशा भोसले यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची बहुविधता. त्यांनी पारंपरिक गाण्यांपासून ते आधुनिक संगीतप्रकारांपर्यंत सहजतेने वाटचाल केली. प्रत्येक गीतात त्यांनी स्वतःची एक वेगळी छाप उमटवली. त्यांच्या आवाजातील चपळता, लयबद्धता आणि अभिव्यक्तीची ताकद यामुळे त्या नेहमीच रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहिल्या. लता मंगेशकर यांची गंभीर, शुद्ध आणि पारंपरिक शैली आणि आशा भोसले यांची प्रयोगशील, रंगतदार शैली या दोन भिन्न प्रवाहांनी भारतीय संगीताला परिपूर्णता दिली. या दोन्ही बहिणींनी एकत्रितपणे भारतीय संगीताचा सुवर्णकाळ घडवला, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. आज या दोन्ही स्वरसम्राज्ञी आपल्यात नसल्या तरी त्यांचे गाणे हेच त्यांचे खरे अस्तित्व आहे. काळाच्या ओघात अनेक कलाकार येतील-जातील, पण आशा-लता या युगुलाचे स्थान अढळ राहील. त्यांच्या स्वरांनी दिलेली भावस्पर्शी परंपरा ही पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरणार आहे. स्वरांचा हा अखंड झरा आज थांबला असला, तरी त्याची गोडी आणि आठवणी भारतीय जनमानसात सदैव झंकारत राहतील.

# प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात 'हिंदु राष्ट्र समन्वय समिती'ची चेतावणी!

## अवैध भंगार व्यवसाय आणि संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन!

चिपळूण - भगवान परशुरामांची पावन भूमी असलेल्या चिपळूण शहर आणि ग्रामीण भागांत सध्या अवैध भंगार व्यवसायांचा मोठा सुळसुळाट झाला आहे. खाजगी जागा विकत अथवा भाडे तत्त्वावर घेऊन हे व्यावसायिक लोकवस्तीत आणि चिपळूण-गोवा अन् चिपळूण-कराड महामार्गालगत उघडपणे कारभार करत आहेत. या सर्व प्रकारांविषयी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. त्यांनी जिल्हाधिकार्यांना तात्काळ कारवाईचे निर्देशही दिले आहेत. येथील प्रांताधिकारी अशोक लिगाडे यांनी १५ दिवसांची मुदत मागितली असली, तरी आम्ही त्यांना २० दिवसांची मुदत देत आहोत, जर २७ एप्रिल २०२६ पर्यंत या अवैध व्यवसायांवर आणि संबंधित दोषी अधिकार्यांवर कठोर कारवाई झाली नाही, तर हिंदु राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, तसेच राज्यभरातही भंगारवाल्यांची समस्या वाढत असून त्या विरोधातही समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटना लढा देणार आहेत, अशी चेतावणी येथील 'हिंदु राष्ट्र समन्वय समिती'च्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.या पत्रकार परिषदेला हिंदु जनजागृती समितीचे डॉ. हेमंत चाळके, शिवसेना गुहागर विधानसभा निरीक्षक अनुराग उतेकर, विश्व हिंदु परिषदचे पराग ओक, सकल हिंदु समाजाचे राजेश ओतारी, अखिल विश्व गायत्री परिवारचे उमेश महाडिक, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे




अजिंक्य ओतारी आणि सूरज कदम उपस्थित होते.

**पत्रकार परिषदेतील महत्त्वाची सूत्रे**

१. भंगार व्यवसायिकांच्या अवैध कारभारामध्ये रासायनिक ड्रम धुणे, प्लास्टिक रिसायकलिंग, लोखंडी भंगार तोडणे, औद्योगिक कचर्यावर (इंडस्ट्रियल वेस्ट) प्रक्रिया करणे आणि प्लास्टिक आणि पुठ्ठा यांसारख्या अत्यंत ज्वलनशील वस्तूंची साठवणूक करणे, असे गंभीर प्रकार चालू आहेत.

२. या व्यवसायांच्या वैधतेविषयी चिपळूण नगर परिषद मुख्याधिकारी (२४ डिसेंबर २०२५) आणि रत्नागिरी जिल्हाधिकारी (८ जानेवारी २०२६) यांच्याकडे पुराव्यांसह वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.

३. धक्कादायक गोष्ट म्हणजे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) 'मे. अफजल स्क्रॅप मर्चंट'कडे कोणतीही अनुमती नसल्याचे स्पष्ट कळवूनही नगर परिषद प्रशासन स्वतःचा जमा केलेला कचरा याच अवैध व्यावसायिकाला का विकत आहे ? नगर परिषदेचे स्वतःचे प्लांट आणि जागा असतांना चालू असलेला हा व्यवहार भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेचा उघड नमुना आहे.

४. माहिती अधिकारांतर्गत प्राप्त झालेल्या कागदपत्रांनुसार शहरातील एकाही भंगार व्यावसायिकाची नोंद नगर परिषदेच्या दफ्तरात नाही म्हणजेच ना हरकत दाखल्याशिवाय हे व्यवसाय राजरोसपणे चालू आहेत. अशा स्थितीत नगर परिषद मुख्याधिकार्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे 'कोणत्या कायद्यांतर्गत कारवाई करावी' अशी विचारणा करणे, हे अत्यंत हास्यास्पद असून अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवून एकमेकांचे दायित्व इतरांवर ढकलत आहेत. यामुळे जनतेच्या जीविताचा आणि पर्यावरणाचा प्रश्न गंभीर झाला आहे.

५. सुशासनाच्या (त्रेंत्र त्रेंशीपरपलश) आश्वासनांना हरताळ फासला जात आहे. ग्रामीण भागांतही हे संकट पसरले असून २१ मार्च २०२६ या दिवशी नागावे ग्रामपंचायत हद्दीतील प्लास्टिक रिसायकलिंग युनिटला लागलेली भीषण आग हे याचेच उदाहरण आहे.

ही आग विझवण्यासाठी यंत्रणेला मोठे कष्ट घ्यावे लागले आणि परिसरात तीव्र रासायनिक गंध पसरला होता. इतकी गंभीर घटना घडूनही ग्रामपंचायत किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अद्याप गुन्हा नोंदवण्यासाठी तक्रार केलेली नाही. केवळ शिरगाव पोलीस ठाण्याकडून चौकशी चालू आहे. अशा प्रकारे ज्वलनशील असणार्या प्लास्टिक आणि पुठ्ठे यांची साठवणूक करणारी गोदामे चिपळूण येथे भर लोकवस्तीत महामार्गावर आहेत, या ठिकाणी अशी दुर्घटना घडल्यास हे नागरिकांच्या जीवावर बेतणारे ठरेल.

६. सुरक्षेच्या दृष्टीने आणखी एक गंभीर सूत्र म्हणजे ग्रामीण आणि शहरी भागांत भंगार गोळा करणार्या अवैध फेरीवाल्यांची कुठेही नोंद नाही. अशा फेरीवाल्यांवर वर्ष २०२५ आणि २०२६ दरम्यान बी.एन.एस.एस. कलम १२८ (इछडड १२८) प्रमाणे २८ प्रतिबंधात्मक कारवाया झाल्या आहेत. याचा अर्थ हे बाहेरून आलेले लोक चोर्या आणि भविष्यात मोठे गुन्हे करू शकतात, यावर नियंत्रण कुणाचे ?, तसेच २४ मार्च २०२६ या दिवशी वाशिष्ठी नदीच्या पात्रात रासायनिक पिशव्या धुवून जलप्रदूषण केल्याचा प्रकारही समोर आला आहे.

# राजधानीत महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन



नवी दिल्ली : थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज राजधानीत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. नवी दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणात बसवण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र सदनाच्या विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहाय्यक निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे आणि महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

### अक्षय्य तृतीयेचे महत्त्व

अक्षय तृतीया हा सण वैशाख महिन्यात येतो. अक्षय तृतीयेचा दिवस हा त्रेतायुगाचा प्रारंभ दिवस मानला जातो. या दिवशी केलेल्या प्रत्येक शुभकार्माचे शाश्वत असे फळ मिळते. न क्षय इति अक्षय याचा अर्थ ज्याचा कधी क्षय म्हणजे नाश होत नाही ते अक्षय. या दिवशी केलेली प्रत्येक उपासना, दानधर्म हे सर्व अक्षय्य होते. महर्षी वेदव्यास यांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवसापासूनच महाभारत हा ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली होती. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी माता गंगा नदी स्वर्गामधून पृथ्वीवर अवतरली होती. अक्षय्य तृतीयेचा हा दिवस माता अन्नपूर्णेचा अवतरण दिवस मानला जातो.

– **संगिता भोसले**, सातारा.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आर. विमला यांच्या 'जियो मन' काव्यसंग्रहाचे नवी दिल्लीत प्रकाशन



नवी दिल्ली : प्रशासकीय जबाबदाऱ्यांचे चक्र अहोरात्र सुरू असतानाही आपल्यातील सर्जनशीलता आणि संवेदनशीलता जिवंत ठेवणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या 'जियो मन'या हिंदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अत्यंत दिमाखदार सोहळ्यात पार पडले. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे आयोजित 'प्रथम अखिल भारतीय मराठी महिला शासकीय अधिकारी साहित्य संमेलना'चे औचित्य साधून हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

महाराष्ट्र सदन, मराठी भाषा विभाग आणि सरहद संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोन दिवसीय संमेलनाच्या उद्घाटन सत्रात हा विशेष सोहळा रंगला. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत, संमेलनाध्यक्षा तथा ज्येष्ठ लेखिका लीना मेहंदळे, माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, सहमहालेखा नियंत्रक सुप्रिया देवस्थळी, मुख्य संयोजक सुषमा नहार आणि लेशपाल जवळगे यांसह प्रशासकीय व साहित्यिक क्षेत्रातील नामवंत उपस्थित होते. आर. विमला यांचा 'जियो मन' हा काव्यसंग्रह मानवी आयुष्यातील चढ-उतार, संघर्ष आणि त्यातून मार्ग काढणाऱ्या दुर्दम्य आशावादाचे प्रतिबिंब आहे. मूळ तामिळ भाषक असूनही त्यांनी हिंदी भाषेवर मिळवलेले प्रभुत्व आणि त्या माध्यमातून मांडलेल्या भावभावना थक्क करणाऱ्या आहेत. या संग्रहात जीवनातील विविध रंग-प्रेम, वेदना, स्मृती आणि संघर्षाचा प्रवास शब्दांकित करण्यात आला आहे. प्रत्येक अंधारानंतर एक नवी पहाट असतेच, हा या संग्रहाचा केंद्रबिंदू असून, वाचकाला स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या रचना यामध्ये आहेत. आर. विमला यांनी त्यांच्या तीन दशकांच्या प्रशासकीय कारकिर्दीत महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास क्षेत्रात मोठे कार्य केले आहे. हेच अनुभव त्यांच्या कवितांमध्ये प्रतिबिंबित होताना दिसतात. त्यांच्या कवितांची शैली साधी, सोपी पण थेट हृदयाला भिडणारी आहे. क्लिष्ट अलंकारिकते पेक्षा शब्दांतील सच्चेपणा वर त्यांनी अधिक भर दिला आहे. 'जियो मन' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह असून, यापूर्वी त्यांचा 'मन रचनाएं' हा संग्रह रसिकप्रिय ठरला आहे.

# संकटात धावून आले सरकार; ना.मकरंद पाटील यांच्या पुढाकारातून १७.०८ कोटींची मदत मंजूर

अवकाळी पावसाच्या तडाख्याने उध्वस्त झालेल्या नाशिक व जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला असून, एकूण रुपये १७,०८,९०,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी आठ लक्ष नव्वद हजार फक्त) इतकी मदत मंजूर करण्यात आली आहे. या मदतीमागे मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील यांची तत्परता, संवेदनशीलता आणि ठोस पाठपुरावा निर्णायक ठरल्याचे स्पष्ट होत आहे.

सप्टेंबर २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत, विशेषतः नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यांतील शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. हातात आलेले पीक वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. या गंभीर परिस्थितीची दखल घेत ना. मकरंद पाटील यांनी तात्काळ प्रशासनाला सतर्क करत नुकसानग्रस्त भागांचा सखोल आढावा घेण्याचे आदेश दिले आणि मदत प्रस्ताव जलदगतीने मंजूर करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे शासन यंत्रणा वेगाने कार्यरत झाली आणि अल्पावधीतच मदत मंजूर होऊन शेतकऱ्यांना आधार मिळण्याचा मार्ग खुला झाला. ही मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून संकटातून सावरण्याची नवी उमेद देणारी ठरत आहे. बियाणे, शेतीपुनर्बांधणी आणि पुढील हंगामासाठी आवश्यक असलेला खर्च भागवण्यासाठी ही रक्कम शेतकऱ्यांसाठी जीवनरेखा ठरणार आहे.

ना. मकरंद पाटील यांनी घेतलेली भूमिका ही केवळ प्रशासकीय न राहता मानवी संवेदनशीलतेची जाणीव करून देणारी ठरली आहे. शेतकऱ्यांच्या वेदना ओळखून वेळेत निर्णय घेण्याची त्यांची कार्यशैली पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. संकटाच्या काळात शासन आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे, हा विश्वास या निर्णयातून अधिक दृढ झाला आहे.

अवकाळी पावसाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी ही मदत नव्या उमेदीची सुरुवात ठरत असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासही या निर्णयाचा मोठा हातभार लागणार आहे. ना. मकरंद पाटील यांच्या सक्रिय नेतृत्वामुळेच संकटाचे रूपांतर संधीमध्ये करण्याचा प्रयत्न यशस्वी होत असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# आनंद वाटल्याने अधिक वाढतो : प्रा.डॉ.संजय कळमकर

शिराळा :कोकरूड ता.शिराळा ग्रामपंचायत,ग्रामस्थ आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेत 'आनंदी जीवनाच्या वाटा' या विषयावरील प्रथम पुष्प गुंफताना बोलत होते. अतिरिक्त पोलीस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील अध्यक्षस्थानी होते. आमदार सत्यजित देशमुख, जी.प.सदस्या साईतेजस्वी देशमुख प्रमुख व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.



कळमकर पुढे म्हणाले की, 'जगातील १४२ देशांचे सर्वेक्षण करून आनंदी देशांची क्रमवारी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये फिनलँड प्रथम क्रमांकावर होता,तर भारत १२६ व्या क्रमांकावर होता; परंतु विनोदाची अन् खेदाची बाब म्हणजे पाकिस्तान १०८ क्रमांकावर होता. त्यामुळे भौतिक समृद्धी म्हणजे आनंदी जीवन नव्हे. पूर्वी गरिबीतही आनंद, सुख, समाधान मिळत होते. आता विज्ञान -तंत्रज्ञानाचा अतिरेक होत आहे. मोबाइल हे त्याचे दैनंदिन उदाहरण आहे. पुस्तक वाचनाची आवड, चांगले छंद आणि नाती जपल्याने जीवनातील आनंदाच्या अनेक वाटा गवसतील!' प्रासंगिक विनोद, शाब्दिक विनोद, किस्से, दैनंदिन जीवनातील विसंगतीवर मार्मिक भाष्य करीत कळमकर यांनी श्रोत्यांना खळखळून हसवत प्रबोधन केले.

अध्यक्षीय भाषणात विश्वास नांगरे म्हणाले, आयुष्यात ध्येय ठेवा आणि ते साध्य करण्यासाठी कष्ट करा. अपयश आले तरी खचून न जाता, कमतरता शोधून पुन्हा जोमाने तयारी करा. शॉर्टकट शोधू नका; प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनत घ्या,जेव्हा सर्व काही संपल्यासारखे वाटते, तेव्हा तुमचा आत्मविश्वासच तुम्हाला तारतो. सत्यजित देशमुख म्हणाले, यूपीएससी एमपीएससी मधून गावागावात अधिकारी घडावे असा मानस असून, त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत लवकरच कोकरूड येथे सर्वसोयीनियुक्त अकॅडमी उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

प्रा.ए सी.पाटील यांनी प्रास्ताविक केले. ग्रामीण कथाकार बाबासाहेब परिट यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रा.अशोक कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. उपसरपंच सुरेश घोडे यांनी आभार मानले संपतराव देशमुख,विकास नांगरे,अनिलराव देशमुख, सरपंच अनिता देशमुख, सुवर्णाताई नांगरे,उपसरपंच सुरेश घोडे, पी.आय. अर्जुन घोडे श्रीरंग नांगरे,अंकुश नांगरे, नंदकुमार पाटील,पोपट पाटील, मोहन पाटील,भरत नांगरे,दिलीप पाटील,तोशीब मकानदार,सुभाष सुतार यांचेसह ग्रामस्थ रसिकश्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'जो भी है बस यही एक पल है' हे गीत त्यांच्या जीवनाचे तत्वज्ञान होते'

# आशा भोसले सिद्धहस्त व प्रतिभासंपन्न गायिका: राज्यपाल जिष्णु देव वर्मा





मुंबई : महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका, पद्मविभूषण व महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. आशा भोसले या देशातीलच नाही तर संगीत विश्वातील सिद्धहस्त आणि प्रतिभासंपन्न पार्श्वगायिका होत्या. आपल्या अवीट स्वरांनी, विविध संगीत प्रकार लीलया गाण्याच्या क्षमतेने आणि संगीतातील व्यापक योगदानामुळे त्यांनी संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य केले. आपल्या जवळपास आठ दशकांच्या सांगीतिक कारकिर्दीत त्यांनी विविध भाषा व संगीत प्रकारांमध्ये असंख्य अजरामर गीते सादर करून भारताच्या सांस्कृतिक परंपरेला समृद्ध केले.

आशाजींची भावोत्कटता व कलेप्रती बांधिलकी भावी पिढ्यांमधील कलाकार आणि रसिकांना प्रेरणा देत राहील. 'जो भी है बस यही एक पल है' हे त्यांचे गाजलेले गीत त्यांच्या जीवनाचे तत्वज्ञान झाले होते. आशाजींच्या निधनामुळे संगीत विश्वाचे, विशेषतः महाराष्ट्र राज्याचे, कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. आशाजींचा विवाह आर. डी. बर्मन यांच्याशी झाल्यामुळे त्यांचा आमच्या घराण्याशी देखील निकटचा संबंध होता. या दुःखद प्रसंगी मी महाराष्ट्रातील जनतेच्या तसेच आपल्या स्वतःच्या वतीने दिवंगत आशाजींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना तसेच संपूर्ण संगीत क्षेत्राला आपल्या शोकसंवेदना कळवतो, असे राज्यपालांनी आपल्या शोक संदेशात म्हटले आहे.



**महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज लोकभवन मुंबई येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

# अक्षय्य तृतीया विशेष

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर शुभकार्य आणि दानधर्म करण्याबरोबरच पितरांसाठी तर्पण आणि पिंडदान करण्यालाही विशेष महत्त्व आहे. उन्हाळ्यात पाण्याने भरलेला घट म्हणजे माठ दान केल्यास पितरांना शीतलता मिळते आणि त्यांचे कृपाशीर्वाद देखील आपल्याला मिळतात. त्याचप्रमाणे या दिवशी भगवान विष्णूची चंदनाने पूजा करण्याला देखील महत्त्व आहे.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी शुचिर्भूत होऊन भगवान विष्णूची पूजा करावी. अक्षय्य तृतीयेचा दिवस हा माफीचा दिवस म्हणूनही ओळखला जातो. या दिवशी जर एखाद्या व्यक्तीने आपल्या किंवा आपल्या प्रियजनांकडून कळत- नकळत झालेल्या चुकांसाठी त्यांची माफी मागितली तर त्या सर्व चुका माफ होतात असे शास्त्र आहे आणि त्यामुळे त्याला देवतांचा देखील आशीर्वाद मिळतो.

– **भीमराव साळुंखे, सातारा.**

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✻ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# प्रशासकीय महिलांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून 'महिला सक्षमीकरणाचा हुंकार'

नवी दिल्ली : महिलांमध्ये काम करण्याची प्रचंड ताकद असून समाजात सकारात्मक बदल घडवण्याची जिद्द त्यांच्यात उपजत असते. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःला केवळ महिला म्हणून न पाहता एक सक्षम अधिकारी म्हणून सिद्ध करणे महत्त्वाचे आहे,असे प्रतिपादन मुंबई महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी येथे केले.

नवी दिल्ली येथे आयोजित प्रशासकीय महिला अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्या दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभागी झाल्या होत्या. या संमेलनात विविध सत्रांच्या माध्यमातून प्रशासकीय अनुभव, भाषा-संस्कृती आणि महिला सक्षमीकरणाच्या विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

संमेलनाच्या सृजनाची मुक्त झेप स्वप्न आणि वास्तव या विशेष संवाद सत्रात आश्विनी भिडे यांची ऑनलाइन प्रकट मुलाखत दैनिक पुढारीच्या वरिष्ठ पत्रकार मृणालिनी नानिवडेकर यांनी घेतली. यावेळी भिडे यांनी आपल्या प्रशासकीय कारकीर्दीतील विविध पैलू उलगडले. सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि लोकांशी थेट संवाद यामुळे प्रशासनात विश्वासार्हता निर्माण होते, असे नमूद करून त्यांनी वर्क-लाईफ बॅलन्स, कौटुंबिक सहकार्य आणि टीम बिल्डिंगच्या महत्त्वावर भर दिला. सर्वांना सोबत घेऊन काम केल्यामुळेच मेट्रोसारखे अनेक मोठे आणि क्लिष्ट प्रकल्प यशस्वी करता आले, असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.




मराठीशी समरस होताना या परिसंवादात परराज्यातून महाराष्ट्रात सेवा बजावत असलेल्या महिला अधिकाऱ्यांनी आपला भाषिक आणि सांस्कृतिक प्रवास मांडला. गृह मंत्रालयाच्या अपर मुख्य सचिव राधिका रस्तोगी यांनी मराठी साहित्यातील श्रेष्ठ रचनांच्या अनुवादाची गरज व्यक्त केली, तर संचालक सुमन रावत यांनी 'जोगवा' आणि 'उंबरठा' सारख्या चित्रपटांतून महाराष्ट्राची संस्कृती जवळून अनुभवता येते असे नमूद केले. याच सत्रात श्वेता सिंघल यांनी भावनांचे महत्त्व अधोरेखित करत, आता मी उत्तर प्रदेशची कमी आणि मराठीच जास्त झाले आहे,अशा शब्दांत आपली मराठी मातीशी असलेली जवळीक व्यक्त केली. त्यांच्या घरी आता मराठी संस्कृती आणि व्यंजने पूर्णतः स्वीकारली गेल्याचेही त्यांनी सांगितले.

संमेलनाच्या पुढील सत्रात भाषा, संस्कृती आणि प्रशासन परराज्यातील मराठी महिला अधिकाऱ्यांचे अनुभव या विषयावर परिसंवाद पार पडला. यावेळी भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी अनुपमा निलेकर यांनी बिहारमधील मराठी समाजाचा उल्लेख करत, तेथील मराठी लोक गणेशोत्सवासारखे अनेक महाराष्ट्रीयन सांस्कृतिक उपक्रम उत्साहाने साजरे करत असल्याचे सांगितले. भारतीय सेवेतील अधिकारी प्रतिभा पारकर यांनी भाषा, संस्कृती आणि साहित्य ही आपली ओळख असून ती जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्यांनी अंगोला देशात भारतीय टीम तयार करून मराठी व हिंदी नृत्याद्वारे भारतीय संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार केल्याचे स्पष्ट केले. तर ग्रामविकास विभाग सचिव रोहिणी भाजीभाकरे यांनी स्थानिक भाषा समजून घेण्याचे महत्त्व सांगताना तमिळ भाषा शिकताना आलेले अनुभव हलक्या-फुलक्या शैलीत मांडले. डोरेमॉन'च्या माध्यमातून भाषा शिकण्याचा त्यांचा किस्सा सभागृहात हास्याची लहर पसरवून गेला. एक भारत श्रेष्ठ भारत या संकल्पनेला भाषा आणि संस्कृती जोडतात, असे त्यांनी स्पष्ट केले.महिला सक्षमीकरण संधी, आव्हाने आणि धोरणात्मक दिशा या विषयावर आयोजित परिसंवादात मान्यवरांनी महिलांच्या प्रशासकीय संधींवर भाष्य केले. भारत सरकारच्या एलपीएआय सदस्य रेखा रायकर यांनी जागतिक स्तरावरील महिलांच्या संघर्षाचा संदर्भ देत 'जेंडर न्यूट्रल' प्रशिक्षणाची गरज अधोरेखित केली. मुख्यमंत्री कार्यालयाच्या जनसंपर्क अधिकारी कीर्ती पांडे यांनी कष्टकरी आणि नोकरदार महिलांच्या समस्यांचे स्वरूप भिन्न असल्याचे सांगत प्रश्नांच्या स्वरूपानुसार धोरणे आखली जावीत, असे मत व्यक्त केले. पुणे महानगरपालिकेच्या मुख्य विधी अधिकारी डॉ. निशा चव्हाण यांनी महिलांनी आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने समाजात मोठे परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन केले, तर संयुक्त आयकर आयुक्त कविता पाटील यांनी महिलांच्या नैसर्गिक गुणांचा प्रशासकीय कामात सकारात्मक वापर करण्याचा मोलाचा सल्ला दिला.

या संपूर्ण संमेलनातील विविध विशेष सत्रांचे सूत्रसंचालन मंत्रालयातील उपसचिव टीना संखे आणि पुणे येथील उपवनसंरक्षक स्नेहल पाटील यांनी केले. तसेच भारतीय सेवेतील अधिकारी क्रांती खोब्रागडे, सुचिता लोखंडे, अपर आयुक्त प्रांजल चोभे-शिंदे आणि ज्येष्ठ पत्रकार प्रगती बाणखेले यांनी संवादक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि मराठी साहित्याप्रती असलेली ओढ यांचा एक अनोखा संगम या संमेलनाच्या निमित्ताने राजधानीत पाहायला मिळाला.

# परळी येथील शिवमंदिरांचे जतन, संवर्धन करण्यासाठी ६ कोटी ५४ लाख

सातारा- परळी ता. सातारा येथे सज्जनगडाच्या पायथ्याशी असलेली प्राचीन केदारेश्वर व महादेव मंदिर, या दोन शिवमंदिराचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या विशेष प्रयत्नातून ६ कोटी ५४ लाख ३० हजार रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. निधी मंजूर केल्याबद्दल ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. श्रीमती सुनेत्रा पवार यांचे आभार मानले आहेत.

परळी येथे प्राचीन हेमाडपंथी शैलीतील केदारेश्वर व महादेव मंदिर, ही दोन मंदिरे १३ ते १४ व्या शतकातील असल्याचे मानले जाते. या दोन्ही मंदिरात सुंदर कोरीव काम असून मंदिरात दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येत असतात. सध्यस्थितीत मंदिरांची देखभाल न झाल्याने मोठ्या



प्रमाणात दुरावस्था झाली आहे.

हा ऐतिहासिक, धार्मिक, पुरातन ठेवा जतन करण्यासाठी ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे विशेष प्रयत्न व पाठपुरावा सुरु होता. महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे व लेणी यांचे जतन व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीने नुकत्याच झालेल्या बैठकीत परळी येथील केदारेश्वर व महादेव मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार राज्य सरकारने या कामासाठी ६ कोटी ५४ लाख ३० हजार रुपये निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मंजूर निधीमधून या मंदिरांच्या जीर्णोद्धारासह विविध विकासात्मक कामे केली जाणार आहेत. केदारेश्वर व महादेव मंदिर हा पुरातन ऐतिहासिक, धार्मिक अनमोल ठेवा जतन व संवर्धन करण्यासाठी ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध झाल्याबद्दल परळी खोऱ्यातील जनतेसह राज्यभरातील भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# गरजवंताला अक्कल नसते;गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांचा पुढाकार

**उंब्रज(प्रतिनिधी):** उंब्रज,ता.कराड पासून पुढे चरेगावकडे जाणाऱ्या पाटण पंढरपूर राज्यमार्गाच्या रुंदीकरणाचे काम काही महिन्यांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले होते. सध्या या कामाची पाहणी केली असता, या परिसरात बऱ्याच ठिकाणी काँक्रीटीकरणाचे काम अजूनही अपूर्ण अवस्थेत असल्याचे आढळून येते. तसेच उंब्रज कडून चरेगावच्या दिशेने जाणाऱ्या बाजूची साईड पट्टी भरून न घेतल्यामुळे स्थानिक रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शेतामध्ये ट्रॅक्टर जाण्यासाठी वाट नसल्यामुळे शेतातील मान्सूनपूर्व कामे खोळंबली आहेत. तसेच या ठिकाणी गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. काही रहिवाशांची घरे रोड लगत असल्यामुळे रहिवाशांना ये-जा करण्यासाठी कसरत करावी लागत असून आपली दुचाकी तसेच चार चाकी वाहने रस्त्याच्या बाजूलाच पार्किंग करावी लागत असल्यामुळे रात्रीच्या वेळेस अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे उंब्रज करून चरेगावच्या



दिशेने जाणाऱ्या बाजूची साईडपट्टी न भरताच रस्ता रुंदीकरणाचे काम ठप्प झाल्याने प्रवाशांसह स्थानिक नागरिक संताप व्यक्त करत आहेत.दरम्यान,अखेर प्रशासनाच्या या वेळकाढू पणाला कंटाळून,हतबल होत होणारी गैरसोय टाळण्यासाठी काही स्थानिक रहिवाशांनी स्वखर्चाने भराव टाकून आपल्या घरासमोरील साईड पट्टी भरून घेतली आहे. त्यामुळे या ठिकाणी गरजवंताला अक्कल नसते या म्हणीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ साईडपट्टी भरण्याचे काम हाती घ्यावे अशी मागणी स्थानिकांसह प्रवाशांनी केली आहे.

# पीर सल्लाउद्दीन बाबा दर्गाचा उरुस १४ व १५ एप्रिलला



शिराळा (प्रतिनिधी) : शिराळा येथील तोरणा भुईकोट किल्ल्यावर असलेल्या पीर सल्लाउद्दीन बाबा दर्गाचा उरुस दि. १४ एप्रिल (मंगळवार) व १५ एप्रिल (बुधवार) रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या उरुसानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता संदल (गंधरात) कार्यक्रम होणार आहे.

बुधवार दि. १५ एप्रिल रोजी दुपारी १ ते सायंकाळी ६ या वेळेत गलफ मिरवणूक काढण्यात येणार असून, सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच याच दिवशी रात्री ७ वाजता गलप विधी पार पडणार आहे.

या उरुस सोहळ्यास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी अध्यक्ष रफिक आत्तार, उपाध्यक्ष समीर मुजावर, मेहबूब मुल्ला, मुर्तुजाली घाशी, दस्तगीर अत्तार, फिरोज मुजावर, इकबाल पठाण, झाकीर दिवाण, अल्ताफ मुल्ला, सोहेल मुल्ला, ड. गौस मुल्ला, भूषण देशमुख, जयसिंग कवठेकर, शाहरूख पठाण, इंजमाम मुजावर, सर्फराज मुल्ला आदी कार्यरत आहेत.

# नवी दिल्ली महिला अधिकारी साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेच्या लेखाने नवा वाद

**(अजित जगताप)**

नवी दिल्ली : वारकरी संप्रदायाच्या चळवळीमध्ये प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी होत आहे. या प्रवृत्तीमुळे चळवळीचा मूळ प्रबोधनात्मक हेतू धोक्यात येत आहे. असे परखड मत ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी अखिल महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलन निमित्त प्रकाशित सौदामिनी या स्मरणिकेत लिहिलेले लेखात केल्याने चांगलाच नवा वाद पेटला आहे.

नवी दिल्ली येथे ११-१२ एप्रिल २०२६ रोजी महिला शासकीय अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. सरहद संस्था (पुणे), नवीन महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त सनदी अधिकारी लीना मेहेंदळे होत्या . हे संमेलन छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीनिमित्त, प्रशासकीय सेवेतील महिलांच्या साहित्याला मंच देण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाच्या सोहळ्याला महिला अधिकाऱ्यांनी लिहिलेले लेख कविता यांचे स्मरणिका 'सौदामिनी' या स्मरणिकेचे प्रकाशन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय पातळीवर

प्रशासकीय कामाच्या धकाधकीतही सर्जनशीलता जपणाऱ्या महिला अधिकाऱ्यांच्या अनुभवांना व्यासपीठ देणे, कविता आणि परिसंवादांतून महिलांचे प्रश्न मांडणे प्रशासनातील अनुभव आणि साहित्य निर्मिती, महिला सक्षमीकरण आणि लेखन, गझल सादरीकरण, आणि कवयित्रींचे काव्यवाचन असे कार्यक्रम झाले. महिला अधिकाऱ्यांना सचिव पदासाठी मंत्री डावलतात. असा आरोप राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनीही लेखात स्पष्टपणे भूमिका मांडली आहे. त्याची चर्चा सुरू आहे.




या पहिल्याच ऐतिहासिक संमेलनामुळे प्रशासकीय सेवेतील महिलांच्या साहित्यिकाचा सन्मान करण्यात आला होता. हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम ठरला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या पत्नी छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीचे औचित्य साधून करण्यात आले आहे. या पहिल्या महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या संमेलनाच्या अध्यक्षपदी वरिष्ठ प्रशासकीय (निवृत्त) अधिकारी १९७४ बॅचच्या भारतीय प्रशासकीय सेवेतील सदस्या लीना मेहेंदळे यांची निवड करण्यात आल्याची घोषणा संमेलनाच्या निमंत्रक आर. विमला तसेच स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांनी केली आहे.

या महिला अधिकाऱ्यांच्या साहित्य संमेलनाच्या सौदामिनी या स्मरणिकत ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी खास करून महिला अधिकारी अंधश्रद्धेच्या व बुवाबाजीच्याच चक्रात अडकून पडलेले आहेत. वारकरी मध्ये प्रत्येकांनी लोकांचे घुसखोरी झाली असून महिलांना विशेषता शासकीय अधिकाऱ्यांनी वारकरी संप्रदायाच्या पुरोगामी विचारांचा वारसा जपला पाहिजे. अशी भूमिका मांडली आहे. या भूमिकेचे अनेकांनी स्वागत केले आहे. पुरोगामी चळवळी हे विश्वच माझे घर असे मानते. तर काही प्रतिगामी हे मनुस्मृति ग्रंथाच्या आधार घेऊन आजही प्रतिगामी विचार जपतात. अशी आता टीका होऊ लागलेली आहे.






ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी जाहीर पणाने घेतलेल्या या भूमिकेचे अनेकांनी स्वागत केले आहे. ज्येष्ठ साहित्यिका व प्रशासकीय सेवानिवृत्त अधिकारी लीना मेहंदळे या महाराष्ट्रातील खानदेशांमधील कवियत्री बहिणाबाई चौधरी यांच्या भूमीतून जन्म घेतलेल्या पुरोगामी लेखिका संमेलनाच्या अध्यक्ष लाभले असल्यामुळे ज्येष्ठ नेते श्री पवार यांच्या लेखाला महत्त्व प्राप्त आलेले आहे. संपूर्ण देशामध्ये आता प्रतिगामी वारे वाहत असताना पुरोगामी विचारांची झुळकच अनेकांना आकर्षित करू लागलेली आहे.

या संमेलनासाठी महाराष्ट्र सदनला आगाऊ कल्पना देऊनही काहींची व्यवस्था होऊ शकलेली नाही. नूतनीकरण व संमेलनाच्या कार्यक्रमाचे निमित्त सांगून प्रवेश नाकारला असला तरी अनेकांनी महाराष्ट्र सुद्धा भेट देऊन युगपुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन केले. खास करून सातारा जिल्ह्यातील सेवानिवृत्त रेल्वे अधिकारी प्रेमानंद जगताप, सामाजिक कार्यकर्ते अँड .संजय गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अजित जगताप शहाजी गुजर व सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय पातळीवर काम करणारे सच्चे आंबेडकरवादी श्री नितीन कांबळे आदी मान्यवर या वेळेला महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे उपस्थित होते.

# स्नेहदीप चव्हाण यांची पुणे रेल्वे लोहमार्ग सुरक्षा दलात निवड

मसूर - कोपर्डे हवेली ता कराड येथील स्नेहदीप माधव चव्हाण यांची पुणे रेल्वे लोहमार्ग सुरक्षा दलात निवड झाली. या त्यांच्या निवडीबद्दल माजी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

पंचायत समिती सदस्य सिद्धार्थ चव्हाण, आर जी तांबे, प्रताप चव्हाण, माधव चव्हाण उपस्थित होते. कराड - पाटण फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष व कोपर्डे हवेली येथील प्रसिद्ध इंद्रायणी भात उत्पादक शेतकरी संघाचे अध्यक्ष माधव चव्हाण यांचे ते चिरंजीव आहेत. स्नेहदीप हे उत्कृष्ट धावपट्टू व मॅरेथॉनपट्टू म्हणून ओळखले जातात . कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात बीएससी पर्यंत ते एनसीसी बेस्ट कॅडीडेट होते. क्रिकेट खेळातही त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे.

भरतीपूर्व चाचणीचा सराव यशवंतनगरच्या यशवंतराव चव्हाण विद्यालयाच्या क्रीडांगणावर केला होता. त्यांच्या यशाबद्दल सर्व अभिनंदन होत आहे.

# शालेय बसचे भाडे आता सरकार ठरवणार-परिवहनमंत्री सरनाईक

मुंबई : महाराष्ट्रात स्कूल बसच्या भाडे नियंत्रणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यात नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले



जाईल. तर आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

# एसआयटीच्या रडारवर छत्रपती संभाजीनगर

## शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण; बनावट मान्यता, कागदपत्रांद्वारे लाटले अनुदान



छ. संभाजीनगर : राज्यभर गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याचे लोण छत्रपती संभाजीनगरमध्येही पोहोचले आहे. खोट्या कागदपत्रांच्या आधारे दिलेल्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, तुकडीला मान्यता नसतानाही संचमान्यता देत नव्याने शिक्षक भरती केल्याचे विविध कागदपत्रांवरून आढळले आहे.सन २०१२ ते २०२५ या दरम्यानच्या कालावधीतील वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, विनाअनुदानितवरून अनुदानावर बदली, शिक्षकेतरहून शिक्षक पदावर पदोन्नती दिलेल्या संचिकांची तपासणी एसआयटी करत आहे. २०२१ पूर्वी नवीन विनाअनुदानित शाळा, नवीन तुकड्या असलेल्या संस्थाचालकांनी अनुदान मिळण्याची आशाच सोडून दिली होती. त्यामुळे बहुतांश संस्थाचालकांनी संचमान्यता करून घेतल्या नव्हत्या. मात्र, २०२१ मध्ये शासनाकडून अंशत: अनुदान मिळण्याची चाहूल लागताच मागील तीन ते पाच वर्षांमधील संचमान्यता 'अर्थ'पूर्ण व्यवहारांद्वारे एकदाच करवून घेतल्या.२०१२ मध्ये शासनाने परिपूर्ण प्रस्ताव आणि नियमात असलेल्या शाळांना तुकडीवाढ दिली होती. शिक्षण विभागाच्या अवर सचिवांनी त्याचे परिपत्रक काढले होते. त्या परिपत्रकात राज्यातील एकूण १८ शाळांना तुकडीवाढ दिल्याची शाळानिहाय यादी होती. अंशत: अनुदान येताच शहरातील नामांकित शिक्षण संस्थाचालकाने प्रस्ताव तयार केला आणि त्या प्रस्तावामध्ये चक्क बनावट परिपत्रक तयार करून जोडले. त्यात स्वत:च्या संस्थेच्या शाळेतील तुकडीवाढ शाळांच्या यादीत डीटीपी टायपिंगद्वारे बनावट परिपत्रकात घुसवण्यात आली. याचीही तक्रार उपसंचालक कार्यालयात प्राप्त झाली आहे. त्याची चौकशी सुरू असून आता अहवालाकडे लक्ष लागलेले आहे.तत्कालीन उपसंचालक प्रकाश मुकुंद यांनी त्यांच्या कार्यकाळात अधिकृतपणे एकही वैयक्तिक किंवा शालार्थ मान्यता दिलेली नाही. तरीही त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या बोगस स्वाक्षरीने मान्यता दिल्याचे प्रकार आता उघडकीस आले आहेत. याकडेही उपसंचालक कार्यालय दुर्लक्ष करीत आहे. हा संपूर्ण प्रकार बोगस मान्यतांच्या आधारे अनुदान लाटण्याचा आहे.

**जावक क्रमांक जुळले नाहीत**

नाशिकचे तत्कालीन उपसंचालक रामचंद्र जाधव यांच्याकडे एक वर्ष संभाजीनगर विभागाचा अतिरिक्त पदभार होता. त्यांच्या कार्यकाळात दिलेल्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, संचमान्यतांचे जावक क्रमांकच जुळत नव्हते. जाधव यांच्या कार्यकाळात मंजूर दाखवलेल्या वैयक्तिक मान्यता नंतर आलेल्या शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख यांनी जावक क्रमांक न जुळणा-या शिक्षकांना पत्रे पाठवून त्यांच्या मान्यता मागवून घेतल्या आणि नंतर 'समाधान'कारक दुरुस्ती केली. हे प्रकरणदेखील आता एसआयटीकडून पडताळून पाहिले जात आहे.

# माजी सैनिकाच्या अल्पवयीन मुलीच्या अपहरण प्रकरणी निषेध;तात्काळ कारवाईची मागणी




कोरेगाव : कोरेगाव तालुक्यातील माजी सैनिकाच्या अल्पवयीन मुलीच्या अपहरणप्रकरणी पोलिस प्रशासनाकडून होत असलेल्या विलंबाचा निषेध करत सैनिक फेडरेशन व माजी सैनिक संघटनांच्या वतीने तहसीलदार, प्रांताधिकारी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

कोरेगाव येथील माजी सैनिक लक्ष्मण नवनाथ जगताप यांच्या अल्पवयीन मुलीचे अतिश मुकुंद जावळे याने एकतर्फी प्रेमातून कोयत्याचा धाक दाखवून ११ मार्च २०२६ रोजी अपहरण केल्याची तक्रार सैनिक फेडरेशनकडे प्राप्त झाली आहे. या प्रकरणी १२ मार्च रोजी कोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे (एलसीबी) वर्ग करण्यात आला आहे. मात्र, घटनेला महिनाभराचा कालावधी उलटूनही मुलीचा शोध लागलेला नसून आरोपी अद्याप फरार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच, या गंभीर प्रकरणात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने पोलिस प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त करण्यात आला आहे. देशसेवा केलेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबीयांना न्याय मिळत नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर संबंधित फरार आरोपीला तात्काळ अटक करून अपहृत मुलीचा शोध घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा कोरेगाव तालुक्यात रास्ता रोको आंदोलन आणि 'सैनिक आक्रोश मोर्चा' काढण्याचा इशाराही देण्यात आला असून, त्यास प्रशासन जबाबदार राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

या वेळी सैनिक फेडरेशनचे राज्य उपाध्यक्ष माजी सैनिक प्रशांत कदम, माजी सैनिक संघटना कोरेगावचे अध्यक्ष नि. सुभेदार मेजर अशोक नलवडे, जिल्हा अध्यक्ष दत्ता माळी, यशवंत शिंदे, ॲड. राजेंद्र कदम, संतोष भोसले, रामचंद्र इंगळे, सागर सुतार, नि. कॅप्टन अंकुश जाधव यांच्यासह विविध तालुक्यांतील माजी सैनिक, पदाधिकारी, शहीद जवानांचे कुटुंबीय आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मसूरमध्ये 'मृत्यूचा टॉवर' उभा! प्रशासन झोपेत

## कंपनी बेफिकीर, जीवितहानीची वाट पाहताय का?

मसूर : कराड तालुक्यातील मसूर च्या मध्यवर्ती गावात गेली अनेक वर्ष एका बंद अवस्थेतील धोकादायक मोबाईल टॉवरमुळे रहिवाशांचा जीव धोक्यात आला असून रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड . कंपनीचा हा टॉवर आजूबाजूला वरदळीची दाट रहिवासी वस्ती असलेल्या एका



इमारतीवर उभारण्यात आला असून, सध्या तो अत्यंत जीर्ण अवस्थेत उभा आहे. विशेष म्हणजे, संबंधित टॉवरचा करार २००७ ते २०२३ या कालावधीसाठी करण्यात आला होता; मात्र करार संपल्यानंतरही कंपनीने तो हटवलेला नाही. प्रशासनाने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०१७ पासून सदरचा टॉवर बंद असून विशेष म्हणजे कंपनीने जागेचे भाडे दिलेले नाही. त्याचबरोबर टॉवरची कोणतीही देखभालही करण्यात आलेली नसल्याचे समोर आले आहे. गेल्या काही वर्षांपासून हा टॉवर वापरात नसून पूर्णपणे बंद अवस्थेत आहे. परिणामी, लोखंडी रचनेला मोठ्या प्रमाणात गंज चढला असून टॉवर एका बाजूला झुकलेला दिसत आहे. यामुळे कोणत्याही क्षणी तो कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या टॉवरच्या परिसरातच रस्त्याच्या दुतर्फा अनेक व्यावसायिक दोन हॉस्पिटल तसेच अनेक रहिवासी घरे आहेत. समोरच राज्य मार्गावरून



होणारी वर्दळ त्यामुळे संभाव्य दुर्घटना झाल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः पावसाळ्यात किंवा जोरदार वाऱ्याच्या वेळी या टॉवरचा धोका अधिक वाढत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये सातत्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी देखील प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित कंपनीकडून करार संपल्यानंतरही टॉवर न हटवणे, भाडे न देणे आणि देखभाल न करणे या बाबी गंभीर स्वरूपाच्या असल्याने याची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

या पार्श्वभूमीवर, संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित कंपनीला टॉवर हटवण्याचे आदेश द्यावेत, तसेच आवश्यक असल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

वेळेत उपाययोजना केल्यास मोठी दुर्घटना टाळता येऊ शकते, अन्यथा भविष्यातील एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता आहे. दरम्यान या प्रकरणी एखादी गंभीर घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार ? हा प्रश्न आहे.

**करार संपला.... भाडे नाही पण धोकादायक टांगती तलवार कायम...!**

**करार संपल्यानंतरही कंपनी टॉवर काढण्यास तयार नाही. मी अनेक वेळा लेखी नोटिसा दिल्या, फोन केले आणि ई-मेलद्वारे संपर्क साधला, मात्र कोणतीही कार्यवाही झालेली नाही. २०१७ पासून भाडेही मिळालेले नाही. मला भाडे मिळाले नाही तरी चालेल, पण नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. हा टॉवर कधीही कोसळू शकतो. त्यामुळे त्वरित तो हटवण्यात यावा. एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल करून आमच्या कुटुंबीयांची तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था झाली आहे.**

**- जागामालक सुनील गणपत सूर्यवंशी**

# महिलांसाठीच्या कर्करोग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




मसुर : जागतिक आरोग्य दिनाच्या पार्श्वभूमीवर लायन्स क्लब मसूर, कृष्णा विश्व विद्यापीठ कराड व प्राथमिक आरोग्य केंद्र मसूर यांचे संयुक्त विद्यमाने ४० वर्षावरील महिलांसाठी स्तनाचा कर्करोग स्क्रीनिंग (तपासणी ) मोफत शिबीर उत्साहात संपन्न झाले. सदर कॅम्प मध्ये १३५ महिलांची नोंदणी झाली ७५ महिन्यांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली

डॉ रमेश लोखंडे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. यामध्ये जागतिक आरोग्य दिनाची या वर्षीची संकल्पना आरोग्यासाठी एकत्र :विज्ञानाचे पाठीशी उभे रहा हे असल्याचे सांगून यास अनुसरूनच आजची ॲक्टिव्हिटी ही नीड बेस्ड आहे व ज्यास्तीत ज्यास्त महिलांनी या सुवर्ण संधीचा फायदा घेणेचे आवाहन केले.

कराड येथील ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ् डॉ अंजनी शाह यांनी महिलांमधील कर्क रोगाची लक्षणे व उपचारा विषयी सविस्तर माहिती दिली माझी प्रांतपाल जगदीश पुरोहित यांनी लाईनीझम म्हणजे काय या बद्दल माहिती दिली. डॉ. वैशाली मोहिते यांनी आजच्या आशा रोटरी एक्सप्रेस व्हॅन बद्दल व या तपासणीचे महत्व समजावून सांगितले तसेच या मधे काही लक्षणे आढळ्यास पुढील सर्व उपचार कृष्णा हॉस्पिटल मधे योजनेतून मोफत केले जातील असे नमूद केले व हे सर्व कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ सुरेश भोसले यांचे सहकार्याने होत असल्याचे सांगितले.

जिल्हा परिषद सदस्य लालासाहेब जगदाळे यांनी सामाजिक कौटुंबिक आरोग्याची गरज ओळखून समाज उपयोगी घेतलेले शिबीर कौतुकास्पद बाब असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन समर्थ लॅबोरेटि चे चालक रमेश जाधव यांनी केले आभार लायन डॉ विक्रम शिंदे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होणेसाठी लायन रमेश जाधव, सौ विद्या जाधव,लायन जितेंद्र निकम, लायन दिलीप पाटील, लायन डॉ विक्रम शिंदे, लायन अशोक कांबळे, लक्ष्मण राजमाने वैद्यकीय अधिकारी डॉ मैथिली मिरजे सर्व आशा, सर्व आरोग्य कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जागतिक अस्थिरतेमुळे कलिंगड फेकून देण्याची वेळ; लाखोंचे नुकसान



औंध(वार्ताहर): औंध येथील कलिंगड उत्पादक शेतकरी गणेश देशमुख यांना जागतिक अस्थिरतेमुळे मोठ्या नुकसानीस सामोरे जावे लागले असून शेती मालाला दर नसल्याने शेतकरी वर्गाचे जीवनमान उध्वस्त होण्याची भिंती निर्माण झाली असून शेतकऱ्यांनी जगायचे कसे असा प्रश्न वारंवार निर्माण होत आहे. याबाबत शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी अशी मागणी केली जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, मागील फेब्रुवारी महिन्यात गणेश देशमुख यांनी लागवड केलेली साडे तीन एकरातील कलिंगड नुकतीच काढणीला आली होती. ही कलिंगड मुंबई,पुण्यासह परदेशात ही ते निर्यात करतात. मात्र यंदा ऐन काढणीच्या हंगामात जागतिक अस्थिरता ,इराण इस्त्रायल युद्धामुळे अजूनही परदेशात निर्यात होणारा लाखो टन नाशवंत भाजीपाला, फळ फळाव तसाच पडून आहे.

अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या निर्यात होणाऱ्या मालाचे मोठे नुकसान झाले आहे.कलिंगडाची निर्यात थांबल्याने स्थानिक बाजारात मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने कलिंगडाचे दर मोठ्या प्रमाणात पडले. त्यातच डाग पडलेल्या फळांना मागणीच नसल्याने गणेश देशमुख यांनी स्थानिक व्यापाऱ्यांना सहा ते आठ रुपयांना कवडीमोल दराने कलिंगडे दिली तसेच उत्पादन जास्त व गरज कमी त्यामुळे राहिलेली कलिंगडे फेकून देण्याची तसेच जनावरांना घालण्याची वेळ आली आहे.

कलिंगडाबरोबरच कांदा,बटाटा पिकास ही दर नसल्याने मोठे नुकसान झाले आहे. कलिंगडासाठी सुमारे अडीच ते तीन लाख रुपये भांडवल घातले त्यामध्ये ही मोठे नुकसान झाले तसेच कांदा ,बटाटयाचे ही दर नसल्याने मोठे नुकसान झाले आहे. सुमारे अडीच हजार कांदा बटाटा पिशवी शेतात पडून आहे.शासनाने याबाबत ठोस धोरण अवलंबावे.योग्य हमी भाव द्यावा.

**- गणेश देशमुख,**
शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते औंध

# जयाद्री खोऱ्यात मार्तंड केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार; दीडशे वर्षानंतर रंगला फड

जेजुरी : महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत दीडशे वर्षानंतर आयोजित ग्रामदेवता जानाई देवीच्या यात्रेत श्री मार्तंड देवसंस्थान च्या वतीने श्री मार्तंड केसरीचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते करण्यात आले.

नवीन पालखी मैदानावर आयोजित कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी सोलापूरचा सिकंदर शेख आणि महाराष्ट्र केसरी कोल्हापूरचा पृथ्वीराज पाटील यांच्यात प्रथम क्रमांकासाठी अतिशय चुरशीची कुस्ती झाली.सुमारे पन्नास मिनिटे एकमेकांना डाव प्रतीडाव टाकीत शेवट पर्यंत आव्हान दिले.अखेर ही कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली.

या दोन्ही मल्लांना श्री मार्तंड




देवसंस्थानच्या वतीने श्री मार्तंड केसरीचा किताब ,चांदीची गदा व रोख रक्कम देवून गौरविण्यात आले. दुसऱ्या क्रमांकाच्या कुस्तीत महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने पंजाबच्या शांटीकुमारला दुसऱ्या मिनिटात आस्मान दाखवीत विजय मिळविला. मल्ल शाहरुख खान, अनिकेत मांगडे यांनी ही चुरशीच्या लढतीत विजय मिळविला.

या कुस्तीच्या आखाड्यासाठी ट्रीपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी, विजय बनकर, किरण भगत, वाघोली येथील महाराष्ट्र केसरीचे आयोजक रामकृष्ण सातव उपस्थित होते. या श्री मार्तंड केसरी कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी दहा हजाराहून अधिक कुस्ती शौकीन उपस्थित होते.

सर्वच कुस्त्या साठी मोठ्या प्रमाणात शौकिनानी बक्षिसे दिली. दीडशे वर्षानंतर भरलेल्या कुस्ती स्पर्धेत नागरिकांनी आनंद लुटला.

# शिराळ्यात आजपासून श्री गोरक्षनाथ यात्रा

शिराळा(प्रतिनिधी): प्रति पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या शिराळा येथील श्री महायोगी गोरक्षनाथ महाराजांच्या यात्रेची जय्यत तयारी पूर्ण झाली असून, सोमवार दि. १३ एप्रिलपासून या यात्रेला सुरुवात होणार आहे. आठ दिवस चालणाऱ्या या यात्रेदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयीसाठी प्रशासन व मंदिर समितीकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. तोरणा आणि मोरणा नदी संगमावर वसलेल्या ऐतिहासिक मंदिर परिसरात महंत पीर पारसनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन केले गेले आहे.शिराळा नगरपंचायतीमार्फत रस्त्यांची दुरुस्ती, खड्डे बुजविणे तसेच साफसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

उन्हाळ्याचा तडाखा लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची टँकरद्वारे व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य विभागाकडून वैद्यकीय पथक व रुग्णवाहिका तैनात करण्यात आली असून, मंदिर परिसरात कीटकनाशक फवारणीही करण्यात आली आहे. यात्रेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विविध ठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात येणार आहेत.

या आठ दिवसांच्या यात्रेत धार्मिक विधी, महापूजा, पालखी सोहळा तसेच शेवटच्या टप्प्यात भव्य कुस्ती मैदानाचा आनंद भाविकांना घेता येणार आहे. तसेच यात्रेनिमित्त पाळणे, मिठाईचे स्टॉल आणि खेळण्यांची दुकानेही थाटण्यात येत आहेत. एसटी महामंडळाकडून अतिरिक्त बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.